**प्रेसनोट दि.०८/०३/२०१९**

**येरवडा पो.स्टे.कडील पोलीस कर्मचारी गर्दीत सापडलेल्या लहान मुलीचे आई-वडीलांचा शोध घेऊन तीचे वडीलांचे ताब्यात दिले.**

---

दिनांक ०४/०३/२०१९ रोजी महाशिवरात्री निमित्त येरवडा पोलीस ठाण्याचे हद्दीतील श्री.तारकेश्वर मंदिर या ठिकाणी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने येरवडा पोलीस स्टेशन कडून मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त नेमण्यात आला होता.

पर्णकुटी पायथा या ठिकाणी बंदोबस्ता करीता हजर असलेले स.पो.नि. सुशिल बोबडे, पो.ना. ६६८६ विठ्ठल खेडकर, पो.शि. ८७५७ सागर कोतवाल यांना सायं. १७:०० वा.चे सुमारास एक लहान मुलगी एकटीच थांबलेली व रडताना दिसली. त्यामुळे पो.ना.खेडकर यांनी तिला बाजूला घेऊन विचारपूस केली असता तिने तिचे नाव श्रावणी मुकेश सोळंकी असे सांगितले परंतू तिला तिचा पत्ता अथवा आई वडीलांचा फोन नंबर सांगता येत नव्हता. त्यामुळे पो.ना.खेडकर यांनी सदर मुलीस सोबत घेऊन तिचे आई वडीलांचा शोध सुरू केला. साधारण १८:३० वा.चे सुमारास सदर मुलीचे वडील श्री. मुकेश सोळंकी हे मिळून आल्याने पो.ना.खेडकर यांनी सदर मुलीस तिचे वडीलांचे ताब्यात दिले. श्री.मुकेश सोळंकी यांनी मुलगी सुखरूप ताब्यात मिळालेबाबत पोलीसांचे आभार व्यक्त केले.

अशारितीने इकडील पो.स्टे.कडील स.पो.नि.सुशिल बोबडे, पो.ना. ६६८६ विठ्ठल खेडकर, पो.शि. ८७५७ सागर कोतवाल यांनी गर्दीमध्ये हरविलेल्या लहान मुलीचे वडीलांचा शोध घेऊन, मुलीस वडीलांचे ताब्यात देऊन चांगली कामगिरी केली आहे.

**( राजेंद्र कदम )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे



